सकाळ

• सातारा, मंगळवार, ७ जानेवारी २०२०

डी. पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगाव

# श्रमप्रतिष्ठेचे संस्कार होतात सेवा योजना शिबिरांतून

## राजाभाऊ जगदाळे; डी. पी. भोसले कॉलेजच्या शिबिराचे एकंब्यात उद्घाटन

**कोरेगाव, ता. ६ :** श्रमप्रतिष्ठा हे मोठे मूल्य असून, त्याचाच संस्कार राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून होतो, असे प्रतिपादन सभापती राजाभाऊ जगदाळे यांनी केले.

एकंबे (ता. कोरेगाव) येथे डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते. कार्यक्रमास सरपंच शोभा कर्णे, उपसरपंच किशोर चव्हाण, पोलिस पाटील विकास शिंदे, विश्वासराव चव्हाण, दिनकरबाबा देवस्थानचे अध्यक्ष शिवाजी चव्हाण, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विजय वाडते, डॉ. सुनील जाधव, डॉ. चंद्रकांत जावळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. नीलेश गोसावी, विविध सेवाभावी मंडळांचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.




**एकंबे (ता. कोरेगाव) : राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना राजाभाऊ जगदाळे, शेजारी डॉ. विजयसिंह सावंत, विश्वासराव चव्हाण आदी.**

श्री. जगदाळे म्हणाले, 'पूर्वीच्या आणि आताच्या शिक्षण पद्धतीमध्ये फरक आहे. स्वप्ने जरूर पाहावीत; परंतु 'कष्ट नको', ही भूमिका बदलली पाहिजे. माणसाने श्रमाची लाज बाळगू नये. श्रमप्रतिष्ठा हे मोठे मूल्य आहे आणि त्याचाच संस्कार राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून होतो.''

या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक भान यावे, जबाबदारी, श्रम, शिस्त, संवाद कौशल्ये विकसित होऊन व्यक्तिमत्त्व विकास व उद्यमशीलता घडावी, अशी अपेक्षा डॉ. सावंत यांनी व्यक्त केली.

यावेळी एकंबे गावातील विद्यार्थी समीक्षा कांबळे, ऐश्वर्या कांबळे, साहिल जाधव यांचा विशेष सत्कार झाला. कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक, प्रा. किरण पवार, देवकी भोसले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी. एस. पवार यांनी आभार मानले.